**"सयाजीराव गायकवाड - सारथी गुणवंत विद्यार्थ्यांना परदेश शिक्षण शिष्यवृत्ती" योजना सुरु करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : सारथी २०२२/प्र.क्र.२८९/का.१४२५-अ**
मंत्रालय, विस्तार इमारत, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २० जुलै, २०२३.

**वाचा :**

१. शासन निर्णय आदिवासी विकास विभाग, क्र. आदिशी-१२०३/प्र.क्र.७६/का-१२, दिनांक ३१ मार्च, २००५.
२. शासन निर्णय आदिवासी विकास विभाग, क्र. पशिशि-२०१५/प्र.क्र.३३४/का-१२, दिनांक १६ मार्च, २०१६.
३. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.इबीसी-२०१७/प्र.क्र.२८८/शिक्षण-१, दिनांक २७ जून, २०१७.
४. शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८
५. शासन निर्णय विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, क्र.शिवृत्ती-२०१८/ प्र.क्र.११८/ शिक्षण, दिनांक ११ ऑक्टोबर, २०१८
६. शासन निर्णय इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्र.शिवृत्ती २०२१/प्र.क्र.३५/शिक्षण-२, दिनांक ११ ऑक्टोबर, २०२२.
७. शासन निर्णय महसूल व वन विभाग, क्र.एस-१०/२०२२/प्र.क्र.२९५/फ-३, दिनांक २४ मे, २०२३.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्यातील मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी या जातीच्या विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणासाठी परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये प्रवेश घेता येत नाही. विद्यार्थ्यांची गुणवत्ता असून आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागते. मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी जातीतील मुलामुलींना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी परदेशी शिष्यवृत्ती योजना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने मा. मंत्रीमंडळाने दिनांक ०४.०७.२०२३ रोजी घेतलेल्या निर्णयास अनुसरुन याबाबत सविस्तर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय** :-

महाराष्ट्र राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी/पदविका व पीएचडी अभ्यासक्रमासाठी QS World Ranking मध्ये २०० च्या आत रॅन्कींग असलेल्या शैक्षणिक संस्था/विद्यापीठामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश घेतील अशा मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रवर्गातील एकत्रितपणे ७५ विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरची योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत "सयाजीराव गायकवाड-सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना" या नावाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राबविण्यात येईल.

३. **या योजनेची व्याप्ती पुढीलप्रमाणे राहील** :-

सदर योजना महाराष्ट्रातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा या जातीतील विद्यार्थ्यांकरिता लागू राहील. पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज सारथी संस्थेकडून ऑनलाईन स्वरुपात मागवून घेण्यात येतील.

४. **शिष्यवृत्ती शाखा निहाय विभागणी** :-

सदर शिष्यवृत्तीसाठी खालीलप्रमाणे शाखा निहाय मर्यादा प्रत्येक वर्षासाठी निश्चित करण्यात आली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | पदव्युतर पदवी/पदविका (MS/M.Tech) | डॉक्टरेट (Ph.D) |
|---|---|---|---|
| १. | अभियांत्रिकी | २० | ०५ |
| २. | वास्तुकलाशास्त्र | ०४ | ०२ |
| ३. | व्यवस्थापन | ०२ | ०१ |
| ४. | विज्ञान | १० | ०५ |
| ५. | वाणिज्य/अर्थशास्त्र | ०४ | ०५ |
| ६. | कला | ०४ | ०५ |
| ७. | विधी अभ्यासक्रम | ०४ | ०१ |
| ८. | औषध निर्माण शास्त्र | ०२ | ०१ |
| | **एकूण** | **५०** | **२५** |

५. जर एखादा विषय/अभ्यासक्रम करिता आवश्यक त्या प्रमाणात विद्यार्थी उपलब्ध झाले नाहीत तर, i) त्याच विषयामधील पदव्युत्तर पदवी/पदविका ते पीएचडी या दोन्ही मध्ये आंतरबदल करण्याचे अधिकार निवड समितीला असतील. ii) वरील (i) प्रमाणे आंतरबदल करुनही जर एखाद्या विषयाकरिता विद्यार्थी उपलब्ध झाले नाहीत तर दुसऱ्या विषयाकरिता मंजूर संख्येपेक्षा जास्त विद्यार्थी उपलब्ध होत असतील तर त्याप्रमाणे बदल करण्याचे सर्वाधिकार निवड समितीला राहतील.

(iii) ज्या अभ्यासक्रमासाठी जास्त संख्येने विद्यार्थी उपलब्ध होतील त्या विषयासाठी प्राध्यान्य देण्यात येईल.

६. शिष्यवृत्ती द्यावयाच्या एकूण जागेपैकी ३० % जागांवर मुलींची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. जर त्याप्रमाणात मुलींचे प्रवेश अर्ज प्राप्त न झाल्यास त्या जागेवर मुलांची गुणवत्तेनुसार निवड करण्याचे सर्वाधिकार निवड समितीला राहतील.

७. या शासन निर्णयासोबतच्या **"परिशिष्ट अ"** मध्ये परदेशी शिष्यवृत्ती करीता शाखानिहाय मंजूर करण्यात आलेला अभ्यासक्रम नमूद करण्यात आला आहे. तसेच **सदर** योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता/अपात्रता, मिळणारे लाभ, शिष्यवृत्तीच्या लाभासाठी निवड कार्य पध्दती इत्यादीची माहिती सोबतच्या **"परिशिष्ट ब"** मध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

८. या योजनेसाठी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात रुपये २५.०० कोटी इतका अतिरिक्त नियतव्यय सारथी या संस्थेकडे उपलब्ध असलेल्या अखर्चित निधीतून भागविण्यात येणार आहे.

९. सदर शासन निर्णय, मा. मंत्रिमंडळाने दिनांक ०४.०७.२०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०७२०१३३७१३६२१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VILAS DNYANOBA LAD

Digitally signed by VILAS DNYANOBA LAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=032607e9d41d4118da0f5f56ec3bafc0cd36444e78848691ec5c4609ff36c6b0, pseudonym=1BBB431FA97E720E6C6B985E9DC9D26CFE5E880D, serialNumber=A2939F426B7A0C7B7ADCBDB9EF405DFECD0B88D1E94A1818DAF4B9F1D6ACEC4B, cn=VILAS DNYANOBA LAD
Date: 2023.07.20 18:41:39 +05'30'

**( विलास लाड )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उप मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.उप मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
५. सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधान भवन, मुंबई
७. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधान भवन, मुंबई
८. सर्व सन्माननीय विधानपरिषद/विधानसभा सदस्य
९. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
१०.सर्व प्रशासकीय विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
११.महालेखापाल लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
१२.महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र ½, मुंबई/नागपूर

१३.व्यवस्थापकीय संचालक, सारथी संस्था, पुणे
१४.संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई
१५.संचालक, उच्च शिक्षण, पुणे
१६.संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
१७.संचालक, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (BNHS)
१८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय
१९.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२०.निवडनस्ती कार्यासन १४२५ अ

## शासन निर्णय क्रमांक : सारथी २०२२/प्र.क्र.२८९/का.१४२५-अ, दि.२० जुलै, २०२३ चे

## परिशिष्ट – अ

## परदेश शिष्यवृत्तीकरीता मंजूर करण्यात येणारे अभ्यासक्रम

| **Engineering/** | | **Architecure** | **Management** | **Science** | **Arts & Commerce** | **Law** | **Pharmacy** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ***Permissible Courses :- P.G./P.G. Diploma/ Ph.D.** | | **P.G./P.G.Diploma/Ph.D** | ***Permissible Courses :- P.G./ P.G. Diploma** | ***Permissible Courses :- P.G./ Ph.D** | ***Permissible Courses :- P.G./ Ph.D** | ***Permissible P.G./Ph.D** | ***Permissible P.G./Ph.D** |
| **1** | | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** |
| 1. | Civil | Architecture | 1. M.B.A. with Finance/ Marketing/H.R./ System Analysis | 1. Agriculture | 1.Sociology | L.L.M. | M. Pharm |
| 2. | Mechanical | | 2.Hotel Management | 2. Horticulture | 2.Psychology | | |
| 3. | Electrical | | | 3.Animal Husbandry | 3.Philosophy | | |
| 4. | Chemical | | | 4.General Science | 4.Economics | | |
| 5. | Computer | | | 5.Maths | 5. Commerce | | |
| 6. | Production | | | 6.Physics | 6. Applied Art | | |
| 7. | Industrial Engg. | | | 7. Chemistry | 7. Fine Art | | |
| 8. | Environmental Engineering | | | 8.Botany | | | |
| 9. | Mining Engg. | | | 9.Zoology | | | |
| 10. | Petrochemical | | | 10.Statistics | | | |
| | Electronic & TC | | | 11.Physics | | | |
| | Information Technology/ Information System/ Information Science/ Computer Engineering | | | | | | |
| 11. | Bio-Technology | | | | | | |
| 12. | Genetic Engineering | | | | | | |
| 13. | Nano Technology | | | | | | |
| 14. | Industry Internet of Things (IIOT) | | | | | | |
| 15. | Cyber Law/Cyber Security | | | | | | |
| 16. | Biomedical Engg. | | | | | | |
| 17. | Climate Change | | | | | | |
| 18. | Artificial Intelligence | | | | | | |
| 19. | Reversible energy | | | | | | |
| 20. | Climate Change | | | | | | |
| 21. | Data Analaysis | | | | | | |
| 22. | Cloud Computing | | | | | | |
| | **Eligibility** | | | | | | |
| | **Graduation for P.G. & Post Graduation for Ph.D in relevant subjects** | | | | | | |

## शासन निर्णय क्रमांक : सारथी २०२२/प्र.क्र.२८९/का.१४२५-अ, दि. २० जुलै, २०२३ चे परिशिष्ट - ब

**सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

१) लाभार्थी हा मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी या जातीतील महाराष्ट्र राज्याचा रहिवासी व भारतीय नागरिक असणे आवश्यक आहे.
२) विद्यार्थ्यांला परदेशातील QS world ranking मध्ये २०० च्या आत रँकींग असलेल्या शैक्षणिक संस्था/विद्यापीठामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश मिळालेला असावा.
३) विद्यार्थ्याने पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी अर्ज करताना पीएचडी अभ्यासक्रमासाठी अर्ज करताना, पीएचडीसाठी यापूर्वी इतर कोणत्याही राज्य शासनाची अथवा केंद्र शासनाची परदेशी शिष्यवृत्ती घेतलेली नसावी. तसेच त्यांने अन्य प्रशासनिक विभागाच्या परदेशी शिष्यवृत्तीच्या योजनेसाठी अर्ज केलेला नसावा.
४) परदेशातील विद्यापीठ/शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश घेणारा विद्यार्थी हा पूर्णवेळ विद्यार्थी म्हणून प्रवेशित असावा.
५) एक्झेक्युटीव्ह पदव्युत्तर पदवी किंवा एक्झेक्युटीव्ह पदव्युत्तर पदविका व अर्धवेळ अभ्यासक्रमांस प्रवेशित विद्यार्थी या योजनेसाठी पात्र असणार नाहीत.
६) प्रवेशित अभ्यासक्रमासाठी अर्ज करताना नमूद केलेल्या विहीत कालावधीत अभ्यासक्रम पूर्ण करणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक असेल, अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ मान्य केली जाणार नाही.

**वयोमर्यादा :-**

पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी लाभार्थ्यांची वयाची कमाल ३५ वर्ष आणि पीएचडी अभ्यासक्रमासाठी लाभार्थ्यांच्या वयाची कमाल ४० वर्ष वयोमर्यादा असावी.

**उत्पन्न मर्यादा :-**

१) या योजनेअंतर्गत लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांचे/कुटुबांचे व विद्यार्थी नोकरी करीत असल्यास त्याचे स्वत:चे उत्पन्न धरुन सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाखापेक्षा जास्त नसावे.
२) विद्यार्थी किंवा पालक किंवा दोन्ही नोकरीत असतील तर त्यांचे आयकर विवरणपत्र, फॉर्म न. १६ व सक्षम प्राधिकारी (तहसिलदार पेक्षा कमी दर्जा नसलेल्या) यांच्याकडील मागील आर्थिक वर्षाचे कुटुंबाचे सर्व मार्गानी मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
३) इतर विद्यार्थ्यांसाठी सक्षम प्राधिकारी (तहसिलदार कमी दर्जा नसलेल्या) यांच्याकडील मागील आर्थिक वर्षाचे कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र, नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**<u>शैक्षणिक अर्हता</u> :-**

१) परदेशातील पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांने भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांमधून किमान ७५% गुणांसहित पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

२) पीएचडी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांने भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांमधून किमान ७५% गुणांसहित पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

३) हा पदवी किंवा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम त्याने अर्जाच्या दिनांकाला उत्तीर्ण केलेला असावा.

**<u>अभ्यासक्रमाचा कालावधी</u> :-**

१) पीएचडी-४ वर्षे किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी या पेक्षा जो कमी असेल तो.

२) पदव्युत्तर पदवी-२ वर्षे किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी यापेक्षा जो कमी असेल तो.

३) पदव्युत्तर पदविका-१ वर्षे किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी यापेक्षा जो कमी असेल तो

**<u>एकाच कुटुंबातील कमाल पात्रता धारक</u> :-**

१) सदर योजनेचा लाभ एका कुटूंबातील एका विद्यार्थ्यास फक्त एकदाच घेता येईल.

२) एकाच कुटुंबातील एकापेक्षा जास्त मुलांना ही शिष्यवृत्ती लागू राहणार नाही. यासाठी पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी तसे प्रतिज्ञापत्र करुन देणे बंधनकारक असेल.

३) सदरची शिष्यवृत्ती एकाच वेळेस मान्य करण्यात येईल. एकापेक्षा जास्त वेळेस विद्यार्थी शिष्यवृत्ती साठी पात्र असणार नाही.

**<u>अर्ज करण्यासाठी अनिवार्य अटी</u> :-**

१) नोकरीमध्ये असलेल्या उमेदवारांनी तो जेथे नोकरी करतो त्या यंत्रणेचे (Organization Employer) ना हरकत प्रमाणपत्र दाखल करणे अनिवार्य आहे.

२) पात्र विद्यार्थ्याने Non Judicial Stamp Paper वर Public Notary समोर विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र लिहून देणे बंधनकारक असेल.

३) विद्यार्थ्याने दोन जामीनदार देणे बंधनकारक असेल. या प्रत्येक जामीनदाराने स्वतंत्र Surety Bond करुन देणे बंधनकारक असेल.

४) अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्याचे स्वास्थ चांगले असले पाहिजे. त्याकरिता त्याने नोंदणीकृत वैद्यकीय अधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

५) विद्यार्थी शिक्षणासाठी आवश्यक असलेला कालावधी किंवा शिक्षण त्यापूर्वी पूर्ण झाल्यास जो कालावधी लागेल या दोघांपैकी जो कमी आहे त्या कालावधी पुरतेच राहण्याचे बंधपत्र (Bond) राज्य शासनास तसेच परदेशातील भारतीय दुतावासास लिहून द्यावे लागेल. या आवश्यक कालावधीपेक्षा जास्त कालावधीकरीता परदेशात राहण्यास विद्यार्थ्यास परवानगी मिळणार नाही.

६) विद्यार्थ्यास सारथीने विहीत करून दिलेल्या नमुन्यात Record Release Consent Form हा बंधपत्राच्या स्वरुपात द्यावा लागेल.

७) विद्यार्थ्यास परदेशामध्ये प्रवेश मिळण्यासाठी QS World Ranking मधील २०० च्या आतील अद्ययावत जागतिक क्रमवारीत असलेल्या विद्यापीठ/शिक्षणसंस्था मध्ये प्रवेशासाठी स्वत: प्रयत्न करावा लागेल व त्यासाठी आवश्यक त्या सर्व पात्रता परीक्षा देणे बंधनकारक असेल.

८) ज्या विद्यार्थ्यांना परदेशी शैक्षणिक संस्थांकडून Unconditional Offer Letter मिळालेले असेल, त्यांनाच ही शिष्यवृत्ती अनुज्ञेय राहील, यासाठी Conditional Offer Letter गृहीत धरले जाणार नाही.

९) विवाहीत उमेदवाराच्या पत्नी/पती व मुले यांना परदेशामध्ये सोबत घेवून जाण्यासाठी कोणत्याही प्रकारचे सहाय्य दिले जाणार नाही. त्यासाठी पासपोर्ट मिळविणे, व्हिसा मिळविणे, आर्थिक तरतूद करणे, परदेशातील निवास व दैनंदिन खर्चाची व्यवस्था करणे ही उमेदवाराची वैयक्तिक जबाबदारी असेल.

१०) नोकरी करणाऱ्या उमेदवारांनी सर्व प्रशासकीय बाबी उदा. रजा, वेतन आणि इतर सेवेच्या बाबी या स्वत: प्रत्यक्षपणे निराकरीत करावयाच्या आहेत. याबाबत कोणत्याही प्रकारची सवलत शासनाकडून मिळणार नाही.

११) अ) अचानक उद्भवलेल्या परिस्थितीमध्ये, परदेशामध्ये शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यास भारतामध्ये यावयाचे असल्यास त्यासाठी त्याचे संबंधित शैक्षणिक संस्था आणि संबंधीत शिक्षण संचालनालयाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक असेल आणि याबाबतची माहिती संबंधित विद्यार्थी भारतीय दूतावासास कळवतील.

ब) जेवढ्या कालावधीमध्ये परदेशातील शैक्षणिक संस्थेमधून दूर असेल, तेवढ्या कालावधीचा कोणताही खर्च त्यास अनुज्ञेय होणार नाही. तथापि, तो पुन्हा त्याच शैक्षणिक संस्थेत त्याच अभ्यासक्रमाचे पुढील शिक्षण पूर्ण करण्यासाठी हजर झालेल्या दिवसापासून त्यास देय लाभ अनुज्ञेय होतील.

क) अशा परिस्थितीत विद्यार्थ्याने परत त्याच परदेशी शिक्षण संस्थेमध्ये हजर न होता शिक्षण अर्धवट सोडल्यास त्यास अदा करण्यात आलेले शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क इतर शुल्क व निर्वाहभत्याची व्याजासह वसूली करण्यात येईल, याबाबतचे लेखी हमीपत्र विद्यार्थ्यास द्यावे लागेल.

१२) पासपोर्ट व व्हिसा मिळविण्याची जबाबदारी उमेदवार/विद्यार्थ्याची असेल.

१३) उमेदवारास/विद्यार्थ्यांना केवळ ज्या शैक्षणिक संस्थेमध्ये, ज्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळालेला आहे व शिष्यवृत्ती मिळाली आहे त्याच कारणासाठी व्हिसा घेणे बंधनकारक असेल.

१४) निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी मागणी केल्यानुसार आवश्यक ती कागदपत्रे सादर करणे व आवश्यक ते करारनामे देणे बंधनकारक असेल.

१५) निवड झालेल्या विद्यार्थ्यास त्याच्या शैक्षणिक कालावधीमध्ये जास्तीची रक्कम अदा झाली असल्यास त्याची परतफेड करणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक असेल. अथवा ती वसूल करणेबाबत प्रचलित कायदे व नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल, याबाबतचे हमीपत्र देणे बंधनकारक असेल.

१६) सदर शिष्यवृत्तीबाबत महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने घेतलेला निर्णय अंतिम असेल.

<u>**उमेदवार/विद्यार्थ्यास मिळणारे लाभ**</u> :-

परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आलेल्या विद्यार्थ्यास खालील लाभ देण्यात येतील.

१) परदेशातील शैक्षणिक संस्थेने पत्रामध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक कालावधीपासून लागू केलेली संपूर्ण शिक्षण फी, अभ्यासक्रमासाठी नजीकच्या मार्गानी इकॉनॉमी क्लास विमान प्रवास भाडे (परतीच्या प्रवासासह) निर्वाह भत्ता, वैयक्तिक आरोग्य विमा यावरील विद्यार्थ्याने प्रत्यक्ष केलेला खर्च विहित केलेल्या वित्तिय मर्यादेत मूळ शुल्क भरणा पावती, प्रवासाचे मूळ तिकिट, मूळ बोर्डिंग पास, परतीच्या प्रवासाचे तिकिट इत्यादी तपासून विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर भारतीय रुपयामध्ये प्रतिपूर्ती (Reimbursement) सारथी संस्थेमार्फत विद्यार्थ्यांकडून प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या १५ कार्यालयीन दिवसाच्या आत जमा करण्यात येईल.

२) सर्वसाधारण पदव्युत्तर पदवीसाठी २ वर्ष किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी यापेक्षा जो कमी असेल व पदव्युत्तर पदविकासाठी १ वर्ष किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी यापेक्षा जो कमी असेल त्या अभ्यासक्रमासाठी नजीकच्या मार्गाने इकॉनॉमी क्लास विमान भाडे परतीच्या भाड्यासह, शिक्षण शुल्क, निर्वाह भत्ता, वैयक्तिक आरोग्य विमा यासह एका विद्यार्थ्यामागे प्रतिवर्षी रु. ३०.०० लाखाच्या मर्यादेत, तर पीएचडीसाठी ४ वर्ष किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी यापेक्षा जो कमी असेल त्यासाठी प्रतिविद्यार्थी प्रतिवर्षी रु. ४०.०० लाखाच्या मर्यादेत शाखा/अभ्यासक्रम निहाय मार्गदर्शक तरतूदीनुसार परदेशी शिष्यवृत्ती अदा करण्यात येईल.

३) प्रवेश घेतलेल्या संबंधित शैक्षणिक संस्थेने ठरवून दिलेल्या अथवा भारत सरकारच्या DOPT विभागाने विदेशी शिष्यवृत्तीसाठी ठरवून दिलेल्या दराप्रमाणे येणारा खर्च भारत सरकारच्या इंडियन ओव्हरसिज स्कॉलरशिप या योजने अंतर्गत देण्यात येत असलेल्या दरवर्षी यु.एस.ए.व इतर देशांसाठी (यु.के.वगळून) १५४०० यु.एस. डॉलर्स आणि यु.के.साठी ९९०० जीबीपी इतक्या रकमेच्या मर्यादेत निर्वाह भत्ता संबंधित विद्यार्थ्याच्या परदेशातील वैयक्तीक खात्यामध्ये जमा केला जाईल. सदर निर्वाह भत्याची रक्कम ही उपरोक्त नमूद पदव्युत्तर पदवी/पदविका असलेल्या प्रतिवर्षी रु.३०.०० लाखाच्या व पीएचडीसाठी असलेल्या प्रतिवर्षी रु. ४०.०० लाखाच्या मर्यादेमध्ये अंतर्भूत आहे.

४) विद्यार्थ्यास परदेशी शिक्षण संस्थेमार्फत किंवा इतर कोणत्याही यंत्रणेमार्फत मिळणारी शिष्यवृत्ती, इतर कोणत्याही प्रकारचे आर्थिक लाभ किंवा शिकविण्याबाबतचे मानधन किंवा फेलोशिप किंवा रिसर्च असोशिएट म्हणून मिळणारी ही रक्कम देय होणाऱ्या शिक्षण शुल्क वा एकूण देय रक्कमे मधून कपात करण्यता येईल.

५) सुरुवातीस परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेणे आणि विहीत कालावधीत अभ्यासक्रमपूर्ण केल्यानंतर त्वरीत कालमर्यादेत भारतात परत येण्यासाठी भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे नजिकच्या मार्गाने इकॉनॉमी क्लास विमानप्रवासभाडे देण्यात येईल. त्यासाठी विमान प्रवासाचे मूळ तिकीट, मूळ बोर्डींग पास, परतीचे प्रवास भाडे मिळण्यासाठी अभ्यासक्रम विहीत कालावधीत यशस्वीपणे पूर्ण केल्याच्या पुरावा इ. कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

६) विद्यार्थ्यांस परदेशात राहण्याच्या कालावधीसाठी विद्यापीठाने ठरवून दिल्यानुसार वैयक्तिक आरोग्य विमा (Personal Health Insurance) काढणे अनिवार्य राहील. यासाठीचा संबंधीत विद्यापीठाच्या निकषानुसार किमान खर्च सारथी संस्थेकडून अनुज्ञेय राहील.

७) वरीलप्रमाणे शिक्षण शुल्क, निर्वाहभत्ता, वैयक्तिक आरोग्य विमा आणि यासाठी निर्धारीत केलेल्या दरापेक्षा होणारा जास्तीचा खर्च विद्यार्थी/उमेदवारास स्वत: सोसावा लागेल व अशा प्रकारचे हमीपत्र विद्यार्थ्यास व पालकास अर्जासोबत द्यावे लागेल.

८) खालील बाबींवरील खर्च अनुज्ञेय राहणार नाही :

i. व्हिसा अर्जावरील खर्च
ii. विद्यार्थ्याच्या कुटूंबातील सदस्यांचा प्रवास व इतर खर्च
iii. नियमित शिक्षणाच्या अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर कोणत्याही अभ्यासक्रम अथवा प्रशिक्षणावरील खर्च
iv. भाषा प्रशिक्षणावरील खर्च
v. नियमित अभ्यासक्रमाच्या कालावधीत अतिरिक्त प्रवासाचा खर्च
vi. संशोधन, पुरक शैक्षणीक साहित्य, क्षेत्र भेटी, कार्यशाळा/ सेमिनार, आंतरवसियता (Internship) यामधील सहभागाचा खर्च.
vii. संगणक व तत्सम शैक्षणिक साहित्य.

९) विद्यार्थ्यास वरील लाभ मिळण्यासाठी परदेशातील प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमामध्ये प्रत्येक वेळी उत्तीर्ण होणे बंधनकारक असून, तसे शैक्षणिक संस्था/विद्यापीठाचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका, प्रगती अहवाल प्रत्येक सत्रासाठी किंवा सहा महिन्यासाठी सादर करणे अनिवार्य आहे.

१०) प्रवेशित विद्यार्थ्यांने प्रत्येक सहा महिन्याच्या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे (Utilization Certificate), खर्चाच्या पावत्या इ. विद्यापीठ / शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाकडून प्रमाणित करुन सादर करणे बंधनकारक आहे. त्याशिवाय पुढील हप्ता मंजूर होणार नाही.

११) अपवादात्मक प्रसंगी, निवड समितीमार्फत Selected Committee ची निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी / पालकांनी, परदेशी शिक्षण संस्था / विद्यापीठ, शिक्षण फी / इतर अनुज्ञेय फी स्वत: भरलेली असेल, अशा वेळी आवश्यक त्या पावत्या व पुरावे सादर केल्यानंतर, अशी रक्कम विद्यार्थ्यास देय होणाऱ्या शिष्यवृत्ती मधून विद्यार्थ्यांच्या परदेशातील खात्यावर जमा करणेसाठी व्यवस्थापकीय संचालक, सारथी, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

१२) विद्यार्थ्यांने भारतात राष्ट्रीयकृत बँकेत व परदेशात अधिकृत बँकेत खाते उघडणे अनिवार्य आहे. त्याच खात्यावर त्यांना देय होणारी शिष्यवृत्ती CMP किंवा RTGS किंवा SWIFT ने अदा केली जाईल. या खात्याचा तपशिल त्यांने परदेशात जाऊन प्रवेश घेतल्या नंतर तात्काळ व्यवस्थापकीय संचालक सारथी पुणे यांना सादर करावा.

१३) परदेशी शिक्षण संस्था / विद्यापीठाने ऑफर लेटर मध्ये संपूर्ण अभ्यासक्रम कालावधीच्या निर्धारीत केलेल्या फी च्या मर्यादेतच लाभ संबंधीत विद्यार्थ्यास अनुज्ञेय होतील. भविष्यात त्यामध्ये वाढ झाल्यास परदेशातील भारतीय उच्चायुक्तालयाच्या शिफारशीनंतरच ही वाढ संबंधित विद्यार्थ्यास अनुज्ञेय राहील.

<u>कर्तव्यात कसूर (Default under the scheme)</u> :-

१. या योजनेखाली निवड झालेल्या शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्याने परदेशात शिक्षण घेताना नियमाचे तसेच अटी व शर्तीचे आणि बंधपत्रामध्ये लिहून दिलेल्या बाबींचे उल्लंघन केल्यास, परदेशीय शैक्षणिक संस्थेने अभ्यासाविषयी अथवा वागणुकीविषयी अथवा गैरहजेरी विषयी प्रतिकूल अहवाल दिल्यास, विद्यार्थ्याने प्रवेश अर्धवट सोडला असल्यास, विद्यार्थ्याने जेथे प्रवेश घेतला आहे तो देश सोडून निघून गेला असल्यास किंवा विद्यार्थ्याने दुसरे विद्यापीठ/शैक्षणिक संस्थेमध्ये विनापरवानगी प्रवेश घेतला असल्यास, किंवा विद्यार्थ्यांची ज्या अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे, तो अभ्यासक्रम त्यांने विनापरवानगी बदलल्यास, किंवा तो भारतात कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता परत आल्यास, अशा विद्यार्थ्यास कर्तव्यनिष्ठुर (Defaulter) समजण्यात येईल आणि त्याला देण्यात आलेली शिष्यवृत्तीची सर्व रक्कम १२% वार्षिक व्याजाने वसूल करण्यात येईल, अशा प्रकारचे संयुक्त हमीपत्र विद्यार्थी व पालक यांनी सादर करणे आवश्यक राहील.

२. कोणतेही कारण अथवा सबबी सांगून अभ्यासक्रम पूर्ण न करणे, विहित प्रयोजनासाठी खर्च न करणे, खर्चात काटकसर न करणे, विहीत लाभ मर्यादेपेक्षा जास्तीची मागणी परदेशात जावून करणे, कोणत्याही प्रकारचा दबाव आणणे किंवा धमकी देणे, सदर नियमावलीतील तरतुदीचे उल्लंघन करणे, परदेशातील नियम/अटी/तरतूदीचे उल्लंघन करणे, वाममार्गास लागणे, परदेशातील शैक्षणिक कालावधीत कोणत्याही प्रकारचे गैरकृत्य करणे व त्यासाठी दंड, शिक्षा होणे, भारतीय राष्ट्रीयत्वास हानी पोहचविणे, भारताची बदनामी करणे याबाबी कर्तव्यातील कसूर समजण्यात येतील. कर्तव्यात कसूर केलेल्या विद्यार्थ्यास/उमेदवारास अपात्र ठरवून त्याच्या परदेश शिक्षणासाठी शासनाने दिलेले सर्व लाभ व्याजासह वसूल केले जातील.

३. परदेशी शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्याने परदेशातील पदव्युत्तर पदवी किंवा पीएचडी अभ्यासक्रम विहित कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यासाठी कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यास मुदतवाढ वा वाढीव खर्च दिला जाणार नाही.

४. परदेशी शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात आलेल्या संबंधित विद्यार्थ्यास उच्च शिक्षण घेण्यासाठी ज्या शैक्षणिक संस्था, विद्यापीठात अथवा अभ्यासक्रमास मान्यता दिलेली आहे, ते ठिकाण वा अभ्यासक्रम विद्यार्थ्याने परस्पर बदलल्यास संबंधित विद्यार्थ्याकडून शिष्यवृत्तीची रक्कम संपूर्णत: वसूल करण्यात येईल.

५. शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आलेल्या अभ्यासक्रमाच्या एकूण खर्चाच्या रकमेपैकी ज्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर झालेली आहे, त्याला त्या वर्षाचे शुल्क, निर्वाह भत्ता व इतर अनुषंगिक खर्च यांची रक्कम संबंधित शैक्षणिक संस्थेकडून, विद्यापीठाकडून प्रमाणित माहिती प्राप्त करून घेऊन ती रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात अदा करण्यात येईल.

<u>अर्ज करण्याची पध्दती</u> :-

सदर शिष्यवृत्तीसाठी प्रत्येक वर्षी एप्रिल/मे महिन्यात व्यवस्थापकीय संचालक, सारथी यांनी प्राधिकृत केलेल्या यंत्रणेमार्फत वृत्तपत्रात तसेच शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द

करतील. तथापि, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता सदर प्रवेश प्रक्रियेबाबतची कार्यवाही सुरु करण्याबाबत निवड समिती निर्णय घेईल.

१) या योजनेसाठी जाहिरात देणे, ऑनलाईन ॲप्लीकेशन तयार करणे, कंत्राटी तत्वावर आवश्यक त्या नियुक्त्या या सारथी या संस्थेमार्फत करण्यात येतील. तथापि, आवश्यक तेथे शासनाच्या पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील. या व इतर बाबींवरील होणारा खर्च सारथी संस्थेकडून अर्थसंकल्पीय मंजूर अनुदानातून करण्यात येईल.

२) सदरची योजना या शासन निर्णयातील नियमावली, अटी व शर्ती नुसार राबविण्यासाठी व्यवस्थापकीय संचालक, सारथी, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत असुन त्यांच्या मार्फत राबविण्यात येईल.

३) सदर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत अथवा शासन निर्धारित करेल इतक्या कालावधीत विद्यार्थ्यांनी विहीत नमुन्यातील परिपूर्ण भरलेले अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासह ऑनलाईन सादर करावेत. अभ्यासक्रमनिहाय असलेल्या क्षमतेच्या अधिन राहून, निवड समितीने निश्चित केलेली पात्र विद्यार्थ्यांची अंतिम निवड यादी साधारणत: दिनांक १ जुलै पूर्वी अथवा निवड समितीच्या निर्णयानंतर शासन जाहीर करेल.

४) शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर संबंधीत शिक्षण संचालनालय संबंधित विद्यार्थ्यांना कळवून त्यांच्याकडून आवश्यक ती माहिती मागविण्यात येईल. तसेच या विद्यार्थ्यांची गृह चौकशी करण्यात येईल.

५) दिनांक १५ जुलै पर्यंत संबंधित विद्यापीठाकडून आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेऊन त्यानंतर १५ दिवसाच्या आत विद्यार्थ्यांना संबंधित परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेण्यासाठी आवश्यकतेनुसार अग्रिम मंजूर करण्यात येईल.

६) विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रवेश घेवून आवश्यक ती माहिती व अग्रीम रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र/पोचपावती संबंधित परदेशी शैक्षणिक संस्थेकडून प्रमाणित होऊन प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांस त्या वर्षीचे अग्रिम समायोजित करुन पहिला अर्ध वार्षिक हप्ता अदा करण्यात येईल.

७) प्रत्येक सहा महिन्याने विद्यार्थ्यांनी दिलेल्या शिष्यवृत्तीचे (शिक्षण फी, परिक्षा फी, निर्वाह भत्ता इ. चे) उपयोगिता प्रमाणपत्र आणि प्रगती अहवाल व्यवस्थापकिय संचालक सारथी, पुणे यांना सादर केल्यानंतर पुढील ६ महिन्याची शिष्यवृत्ती अदा करण्यात येईल. प्रत्येक ६ महिन्याला विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र/खर्चाचा अहवाल प्राप्त झाल्याशिवाय संबंधित विद्यार्थ्यास पुढील शिष्यवृत्ती अनुज्ञेय होणार नाही.

८) सदर अर्जासोबत विद्यार्थ्याने खालील कागदपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

(i) विहीत नमुन्यातील परिपूर्ण अर्ज,

(ii) सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला,

(iii) पदवी / पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे पुरावे. (दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर पदवी/पदविका यांच्या गुणपत्रिकांसह) (सनद/मार्कलिस्ट),

(iv) परदेशातील QS World Ranking २०० च्या आत असलेल्या शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश मिळाल्याबाबतचे विनाअट (Unconditional) ऑफर लेटर.

(v) ज्या विद्यापीठामध्ये प्रवेश मिळाला आहे त्याचे सविस्तर माहिती पत्रकाची (Prospectus) प्रत.

(vi) आवश्यक ते करारनामे व हमीपत्रे.

(vii) दोन भारतीय नागरीकांचे जामीनपत्र,

(viii) संपूर्ण अभ्यासक्रम पूर्ण होण्यासाठी वर्षनिहाय आवश्यक असणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक, ज्यामध्ये शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क, इतर शुल्क पाठयपुस्तके, स्टेशनरी, भोजन व राहण्याचा खर्च, येण्याजाण्याचा विमान प्रवास याचा समावेश असावा.

(ix) विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत.

(x) पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी आणि पीएचडी अभ्यासक्रमासाठी अद्ययावत QS World Ranking ची जागतिक क्रमवारी.

XI) वेळोवेळी सारथी या संस्थेने ठरवून दिलेले बंधपत्र/विविध दाखले तसेच अन्य कागदपत्रे सादर करणे लाभार्थ्यांवर बंधनकारक राहील.

**<u>गुणवत्ता यादी व निवड यादी तयार करण्याची कार्यपद्धती</u> :-**

१. शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणा-या विद्यार्थ्यांपैकी इतर सर्व अटींची पूर्तता होणा-या विद्यार्थ्यांच्या प्राप्त गुणांचे मुल्यांकन खालील प्रमाणे करून त्याचे एकूण गुण विचारात घेऊन गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

**I) पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाकरिता :**

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेला अभ्यासक्रम | प्राप्त केलेले गुण | गुणांचे मुल्यांकन |
|---|---|---|---|
| १ | SSC | ७५ ते ८०% | ५ |
| | | ८०% पेक्षा जास्त | १० |
| २ | HSC | ७५ ते ८०% | ५ |
| | | ८०% पेक्षा जास्त | १० |
| ३ | पदवी | ७५ ते ८०% | ५ |
| | | ८१ ते ८५% | १५ |
| | | ८५% पेक्षा जास्त | ३० |
| ४ | QS World Ranking Average | १ ते ५० | ५० |
| | | ५१ ते १०० | ४० |
| | | १०१ ते १५० | ३० |
| | | १५१ ते २०० | २० |

**II) डॉक्टरेट अभ्यासक्रमाकरिता :**

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेला अभ्यासक्रम | प्राप्त केलेले गुण | गुणांचे मुल्यांकन |
|---|---|---|---|
| १ | SSC | ७५ ते ८०% | ५ |
| | | ८०% पेक्षा जास्त | १० |
| २ | HSC | ७५ ते ८०% | ५ |
| | | ८०% पेक्षा जास्त | १० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | पदवी | ७५ ते ८०% | ५ |
| | | ८१ ते ८५% | १० |
| | | ८५% पेक्षा जास्त | २० |
| ४ | पदव्युत्तर पदवी | ७५ ते ८०% | ५ |
| | | ८१ ते ८५% | १० |
| | | ८५% पेक्षा जास्त | २० |
| ५ | QS World Ranking Average | १ ते ५० | ४० |
| | | ५१ ते १०० | ३० |
| | | १०१ ते १५० | २० |
| | | १५१ ते २०० | १० |

२) सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र. ४ प्रमाणे अभ्यासक्रमनिहाय विद्यार्थी प्रवेश संख्या निर्धारीत केलेली असून त्या मर्यादेत विद्यार्थ्याची निवड करावयाची आहे. त्यामुळे, निर्धारीत केलेल्या सर्व अभ्यासक्रमांसाठी प्रथमत: वरील “I” व “II” करीता दोन स्वतंत्र एकत्रित गुणवत्ता याद्या तयार कराव्यात.

३) अ) गुणवत्ता यादी तयार करतांना समसमान (Tie) गुणवत्ता असलेल्या प्रकरणी QS World Ranking जेष्ठताक्रम असलेल्या विद्यार्थ्यास गुणवत्ता यादीत वरचे स्थान देण्यात यावे.
ब) त्यानंतरही समसमान गुण असल्यास पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरीता पदवी अभ्यासक्रमाचे आणि पीएचडी अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरीता पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे गुण विचारात घेण्यात यावेत.
क) त्यानंतरही समसमान गुणवत्ता असल्यास वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवारास वरचे स्थान देण्यात यावे.

४) मात्र, गुणवत्ता यादीमध्ये समसमान गुणवत्ता असलेल्या अभियांत्रिकी व विज्ञान या शाखेच्या प्रकरणी वरील ३ ब) व ३ क) चा विचार न करता या विद्यार्थ्याची निवड करताना Emerging areas of science and technology चा प्राधान्याने विचार केला जाईल. उदा. Atmospheric sciences, Adaptation and mitigation of Climate Change, Automation and Artificial Intelligence, Renewable Energy, Energy Efficiency Techniques, Biotechnology, Nano Technology, Industry Internet of Things, Data Analytics, Cloud Computing, Cyber Security इ. अभ्यासक्रमांना प्राधान्य दिले जाईल.

५) गुणवत्ता याद्या तयार केल्यानंतर सदरच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. ४ प्रमाणे शाखानिहाय पात्र विद्यार्थ्यांची निवड करण्यात यावी. ही निवड करताना एकूण लाभार्थी विद्यार्थ्यांमध्ये ३०% विद्यार्थिनींची निवड करणे आवश्यक आहे.

६) निवड यादीस शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ते आदेश निर्गमित करण्यात येतील.

**<u>इतर अटी व शर्ती</u> :-**

१) परदेशात अभ्यासक्रम संपल्यानंतर विद्यार्थ्याने दोन महिन्याच्या आत व्यवस्थापकीय संचालक, सारथी, पुणे यांना अंतिम परिक्षेचे गुणपत्र, प्रमाणपत्र आणि प्रगती अहवाल व पदवीदान समारंभाचे छायाचित्रासह माहिती सादर करणे बंधनकारक असेल. त्याशिवाय विद्यार्थ्यास अंतिम विमान प्रवास व इतर लाभ दिले जाणार नाहीत.

२) अभ्यासक्रम संपल्यानंतर या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यास व्हिसा मुदतवाढीसाठी परवानगी दिली जाणार नाही. अभ्यासक्रमाचा कालावधी कोणत्याही कारणास्तव वाढल्यास त्यास अतिरिक्त निधी दिला जाणार नाही.

३) ज्या विद्यापीठामध्ये/शैक्षणिक संस्थेमध्ये विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेला आहे, ते विद्यापीठ/ शैक्षणिक संस्था ही त्या देशातील मान्यताप्राप्त विद्यापीठ/शैक्षणिक संस्था असावी. (Accredited University / Institute) या संबंधीची कागदपत्रे अर्जासोबत सादर करावी. या बाबत काही वाद निर्माण झाल्यास परदेशातील भारतीय उच्चायुक्त यांचे कडून खात्री करुन निवड समिती त्याबाबत निर्णय घेईल.

४) अर्जात नमूद केलेले विद्यापीठ अभ्यासक्रमासाठी काही कारणास्तव विद्यार्थी प्रवेश घेवू शकत नसल्यास, त्याच विद्यापीठात त्याच अभ्यासक्रमासाठी पुढील एका सत्राचा (६ महिन्याचा) कालावधी, कोणतेही अतिरीक्त शुल्क न आकारता संबंधित विद्यापीठ अथवा शैक्षणिक संस्थेने विनाअट वाढवून दिल्यास आणि विद्यार्थ्याने त्यासाठी सबळ कारण/पुरावा सादर केल्यास अशी मुदतवाढ देण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक, सारथी, पुणे यांना असतील. तद्नंतर विद्यार्थ्यास आणखी मुदतवाढ मिळणार नाही.

५) एकदा निवड झालेले विद्यापीठ व अभ्यासक्रम कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाही. मात्र, सबलीकरण विचारात घेवून अशा बदलास मान्यता देण्याचे अधिकार सारथीस राहतील.

६) निवड झालेल्या विद्यार्थ्याला विद्यापीठात प्रवेश घेतल्यानंतर तात्काळ काही अगावू रक्कम भरण्याची आवश्यक असल्यास, अशा आगावू रकमेस मान्यता देण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक, सारथी, पुणे यांना राहतील, मात्र, ही आगावू रक्कम पुढील देय हप्त्यामध्ये समायोजित करण्यात यावी.

७) विद्यार्थ्यांना अर्ज करते वेळी विद्यापीठाकडून मान्य करुन घेतलेल्या संपूर्ण अभ्यासक्रमासाठीच्या कालावधीच्या शिक्षण फी, इतर फी, निवास व भोजनखर्च, निर्वाहभत्ता, आकस्मिक खर्चाची जी महिती सादर केली आहे, त्यापेक्षा जास्तीचा खर्च अनुज्ञेय होणार नाही.

८) अभ्यासक्रमाच्या कालावधी व्यतिरीक्त कोणत्याही परिस्थितीत वाढीव कालावधीच्या व्हिसासाठी मान्यता देण्यात येणार नाही.

९) विद्यार्थ्याने कोणत्या दिनांकास व कोणत्या विमानाने परदेशात जाणार आहे, याची लेखी माहिती व्यवस्थापकीय संचालक सारथी, पुणे यांना सादर करणे आवश्यक आहे. ही माहिती न देता विद्यार्थी परदेशात गेल्यास त्यास विमान खर्च अनुज्ञेय होणार नाही.

१०) आवश्यकतेनुसार विद्यार्थ्याची शैक्षणिक प्रगती, उपस्थिती, वर्तणूक, खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र व इतर तद्नुषंगिक बाबींचा अहवाल परदेशातील भारतीय दूतावासाकडून प्राप्त करुन घेण्यात येईल.

११) अभ्यासक्रमाचा कालावधी संपल्यानंतर परदेशातील वास्तव्यासाठी कोणताही पत्रव्यवहार संचालनालयामार्फत केला जाणार नाही, अथवा विद्यार्थी/पालक यांचा पत्र व्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

१२) परदेशी विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेण्यासाठी GRE (Graduate Record Examination) TOEFL (Test of English as a foreign language), IELTS (International English Language Testing System). प्रकारच्या परीक्षा जेथे अनिवार्य आहेत, त्या उत्तीर्ण होणे विद्यार्थ्यावर बंधनकारक असेल.

१३) विद्यार्थ्यांने शिष्यवृत्तीसाठी अर्जामध्ये नमूद केलेले विद्यापीठ व अभ्यासक्रम त्यांचा कालावधी आणि खर्चाचे तपशिल यामध्ये निवड समितीने निवडीची शिफारस केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाही.

१४) काही कारणास्तव विद्यार्थ्यास त्याची निवड होवूनही त्या वर्षी प्रवेश घेता आला नाही, तर त्यास वयोमर्यादेच्या अधिन राहून पुढील वर्षी नव्याने अर्ज करण्याची मुभा राहील.

१५) परदेशातील भारतीय दुतावासात राज्य शासनाकडून संबंधित विद्यार्थ्याचा प्रगती अहवाल, वर्तणूक खर्चाचा हिशोब इ. माहिती पुरविण्याबाबत विनंती करण्यात येईल. तसेच काही विपरीत बाबी असल्यास, परदेशातील भारतीय दूतावास त्या बाबी राज्य शासनास कळवतील. परदेशात प्रवेशित विद्यार्थ्याच्या प्रगती विषयी मार्गदर्शन व सल्ला देणेबाबत परदेशातील दुतावासास विनंती करण्यात येईल. त्याचबरोबर या विद्यार्थ्यांना परदेशात काही अडचणी उद्भवल्यास मदत करण्यासाठी या दुतावासास विनंती करण्यात येईल. विद्यार्थ्यांनी विद्यापीठात/ शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेतल्यानंतर तात्काळ तेथील भारतीय परदेशी दुतावासास संपर्क साधून आपली नोंदणी करावी व त्याचा तपशिल व्यवस्थापकीय संचालक, सारथी, पुणे यांना सादर करावा.

१६) पीएचडी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांने ज्या विषयाची संशोधनासाठी निवड केली आहे त्याविषयाचा, भारतामध्ये कोणत्याही विद्यापीठामध्ये अंतिम प्रबंध अहवाल (Thesis) सादर केला नसल्याबाबतचे घोषणापत्र (Declaration) सादर करणे आवश्यक आहे.

१७) तसेच निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी व दर्जावाढीसाठी आवश्यक असलेले शिथीलीकरण करण्याचे अधिकार यापुर्वीच्या शैक्षणिक वर्षासह व्यवस्थापकीय संचालक, सारथी, पुणे यांना असतील.

**<u>खोटी माहिती सादर करणे</u> :-**

कोणत्याही विद्यार्थ्याने खोटी माहिती / कागदपत्रे सादर केल्याचे सिध्द झाल्यास अथवा उपरोक्त परिच्छेदाप्रमाणे कर्तव्यात कसूर केल्यास, त्यास ताबडतोब पुढील शिक्षणासाठी अटकाव (Debarred) केला जाईल व त्याच्याकडून झालेल्या खर्चाची १५% चक्रवाढ व्याजाने वसूली करण्यात येईल. अशा विद्यार्थी/उमेदवाराचा काळ्या यादीत समावेश केला जाईल. तसेच प्रचलित कायद्यानुसार

त्याच्या विरुध्द कारवाई करण्यात येईल आणि त्यांनी दिलेले जामीनदार आणि संदर्भ अधिकारी/व्यक्ती यांना सुध्दा ही बाब लेखी स्वरुपात कळविण्यात येईल.

**<u>कायदेशीर बाबी</u> :-**

या संदर्भात कोणत्याही कायदेशीर बाबी उद्भवल्यास मुंबई उच्च न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात असतील. परदेशात उद्भवल्यास कायदेशीर बाबीसाठी परदेशातील उच्चायुक्त कार्यवाही करतील.

**<u>छाननी समिती</u> :-**

या शिष्यवृत्तीसाठी विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती असेल :

| | | |
|---|---|---|
| १. | व्यवस्थापकीय संचालक, सारथी संस्था, पुणे. | अध्यक्ष |
| २. | निबंधक, सारथी संस्था, पुणे | सदस्य |
| ३. | संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई. | सदस्य |
| ४. | संचालक, उच्च शिक्षण, मुंबई. | सदस्य |
| ५. | संचालक, कला संचालनालय, मुंबई. | सदस्य |
| ६. | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, सारथी संस्था, पुणे. | सदस्य |
| ७. | वरिष्ठ प्रकल्प संचालक, सामाजिक न्याय, सारथी संस्था, पुणे. | सदस्य सचिव |
| ८. | संबंधित विषयातील तज्ञ | सदस्य |

उपरोक्त समिती प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन अभ्यासक्रम निहाय पदव्युत्तर पदवी/ पदविका व डॉक्टरेटसाठी राखीव कोटयानुसार आणि परदेशातील विद्यापीठ/शैक्षणिक संस्थेच्या जागतिक क्रमवारीच्या जेष्ठतेनुसार पात्र विद्यार्थ्यांचे प्रस्ताव निवड समितीकडे अंतिम करण्यासाठी पाठवेल.

**<u>निवड समिती</u> :-**

उपरोक्त छाननी समितीमार्फत प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या यादी/प्रस्तावामधून पात्र विद्यार्थ्यांची निवड यादी तयार करणेसाठी निवड समितीची रचना खालील प्रमाणे असेल :

| | | |
|---|---|---|
| १. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव (नियोजन) | अध्यक्ष |
| २. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव (वित्त) | सदस्य |
| ३. | प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव (कौशल्य विकास विभाग) | सदस्य |
| ४. | प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) | सदस्य |
| ५. | व्यवस्थापकीय संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे (सारथी) | सदस्य सचिव |
| ६. | सह सचिव/उप सचिव, नियोजन विभाग (संबंधित विषय हाताळणारे) | सदस्य |
| ७. | शैक्षणिक क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती | सदस्य |